# गतीमान पाणलोट सन २००७-०८

## प्रस्तावना

राज्याची पूर्ण सिंचन क्षमता विकसीत केल्यानंतरही सुमारे ७० टक्के क्षेत्र कोरडवाहूच राहणार आहे. याचाच अर्थ हे ७० टक्के क्षेत्र कायमस्वरुपी पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहणार आहे. या क्षेत्रात शेतीच्या उत्पन्नात शाश्वतता आणण्यासाठी पाणलोट क्षेत्र कार्यक्रमास पर्याय नसल्याने राज्य शासनाने पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यांस प्राधान्य दिले आहे. पाणलोट विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत असलेल्या विविध मृद व जलसंधारणाच्या बाबी गेल्या ५०-६० वर्षापासून राबविण्यांत येत आहे. पाणलोट विकास कार्यक्रमाच्या कामाचे प्रामुख्याने तीन टप्पे पडतात. स्वातंत्रपूर्व काळापासून १९८३ पर्यतच्या कालावधीतील कामे ही सर्वसाधारणपणे पहिल्या टप्प्यात येतात. या कालावधीत प्रामुख्याने समपातळी बांधबंदिस्तीची कामे करण्यांत आली. तथापि या टप्प्यातील कामे ही एकेरी पध्दतीने व शेतक-याच्या मागणीनुसार आणि संमत्तीनुसार करण्यांत येत होती. त्यामुळे या कामाचा एकत्रित परिणाम दिसून येत नव्हता. त्यामुळे १९८३ मध्ये प्रथमच पाणलोट क्षेत्र आधारीत मृद व जलसंधारणाच्या कामांना सुरवात करण्यांत आली. एका विशिष्ठ भूभागाची निवड पाणलोट आधारीत करुन त्यांत मृद व जलसंधारणाच्या बाबी राबविण्यांस या टप्प्यांत सुरवात झाली आणि ही योजना सर्वकष पाणलोट विकास कार्यक्रम म्हणून राबविण्यांत आली. तथापि या टप्प्यातील कामामध्ये फक्त कृषि विभागाच्या कामाचा समावेश करण्यांत आला. त्यामुळे १९९२ मध्ये स्वतंत्र जलसंधारण खात्याची निर्मिती करण्यांत आली. पाणलोट विकास कार्यक्रमाच्या या तिस-या टप्प्यांत समाजिक वनीकरण, लघु पाटबंधारे आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा या विभागाचाही समावेश करण्यांत आला. एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम म्हणून ही योजना आजपर्यत चालू आहे.

## सद्यस्थिती

पाणलोट विकास कार्यक्रमाच्या राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमांत, नदी खोरे प्रकल्प, व पश्चिम घाट विकास कार्यक्रम इ. केंद्र पुरस्कृत योजना कार्यरत आहेत. राज्य शासनाची आदर्श गांव प्रकल्प व संकल्प ही योजना वगळता पाणलोटाची शाश्वत निधीची तरतूद असलेली एकही योजना अस्तित्वात नव्हती. मात्र २००६ पासून मराठवाडयातील ८ जिल्हयासाठी मराठवाडा पाणलोट मिशन आणि विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हयासाठी विदर्भ पाणलोट मिशनची शासनाने स्थापना केली. या दोन्ही योजनासाठी प्रथमतःच निश्चितपणे निधीची तरतूद करण्यात आली. तथापि उर्वरीत राज्यातील पाणलोट विकास कार्यक्रम हा प्रामुख्याने संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, कामासाठी धान्य, दशलक्ष विहीरी, व केंद्र आणि जिल्हा वार्षिक योजना, आदिवासी उपयोजना, विशेष घटक योजना, अनुशेष, रोजगार हमी योजना, या राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिलेल्या निधीवर अवलंबून राहीला. गेल्या १५ वर्षाचा आढावा घेता असे निदर्शनास येते की, पाणलोट कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून पुरवठा झालेल्या निधीचे प्रमाण २८ टक्के आहे. तर ७२ टक्के निधी राज्य शासनाकडून उपलब्ध झाला आहे. राज्य शासनाकडून उपलब्ध झालेल्या

निधीपैकी सुमारे ६० टक्के निधी हा रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध झालेला आहे. एकूण पाणलोट कार्यक्रमाचा विचार करता सुमारे ५० टक्के निधी रोजगार हमी योजनेतून उपलब्ध झालेला आहे. याचाच अर्थ पाणलोट विकासाचा कार्यक्रम प्रामुख्याने रोजगार हमी योजनेवर अवलंबून आहे.

रोजगार हमी योजनेची निर्मिती ही प्रामुख्याने मजूरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी करण्यात आलेली आहे. सध्या या योजनेअंतर्गत पाणलोट कार्यक्रमासारखे उत्पादक स्वरुपाची कामे हाती घेण्यांस प्राधान्य देण्यांत येत असले तरीही या योजनेतून पाणलोटाची कामे करण्यांस अनेक मर्यादा आहेत. दुष्काळी परिस्थितीत मजूरांच्या मागणीनुसार मोठया प्रमाणांत रोजगार पुरविणारी व अकुशल स्वरुपाची कामे ही घेतली जातात. यासाठी अनेक वेळा नवीन पाणलोट सुरु करावे लागतात. मात्र दुष्काळी परिस्थिती संपल्यानंतर मजूर उपलब्ध होत नाहीत आणि परिणामी असे पाणलोट अपूर्ण राहतात तसेच त्यातील कुशल स्वरुपाच्या कामांना निधी उपलब्ध न झाल्यामुळे पाणलोट सर्वार्थाने पूर्ण होत नाही. रोजगार हमी योजनेच्या कामांत लोकसहभागाची संकल्पना नसल्याने त्यातून सुरु करण्यांत आलेले पाणलोट पाठपुराव्या अभावि अपूर्ण राहण्याचेही प्रमाण मोठे आहे. राज्यात सुरु करण्यांत आलेले सुमारे २७००० पाणलोटापैकी ९००० पाणलोट पूर्ण झाले आहेत. याचाच अर्थ सुमारे १८००० पाणलोट अपूर्ण स्थितीत आहेत.

## योजनेचा हेतू

अपूर्ण पाणलोटांची संख्या पहाता ते पूर्ण करण्यासाठी प्रचंड निधीची आवश्यकता आहे. तथापि राज्य योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यांत येत असलेल्या निधीचे एकत्रित नियोजन करुन यातील काही पाणलोट टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने दि. ३० नोव्हेंबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये गतीमान पाणलोट विकास योजना कार्यान्वित केली. या योजनेअंतर्गत अपूर्ण पाणलोट पूर्ण करण्यासाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्यांत आले असून त्यानुसार पाणलोट पूर्ण करण्याचे नियोजन करण्यांत येत आहे. विविध राज्य योजनेअंतर्गत व जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध होत असलेल्या निधीचे जिल्हा स्तरावर एकत्रित नियोजन करुन हा सर्व निधी पाणलोट पूर्ण करण्यासाठी उपयोगात आणण्याचा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

## योजनेचे स्वरुप

सन २००७-०८ मध्ये ही योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यांत आली. यामध्ये पहिल्या टप्प्यांत प्रत्येक तालुक्यातून किमान ७५ टक्के पूर्ण झालेला व ५०० ते १००० हे.क्षेत्र असलेला एक पाणलोट पूर्ण करण्याचे निश्चित करण्यांत आले होते. हा पाणलोट तालुक्यातील एक आदर्श पाणलोट म्हणून पथदर्शक व्हावा यासाठी त्याची निवड अत्यंत नियोजनबध्द रितीने करण्यांत आली होती. प्रामुख्याने लोकसहभाग असलेले काम, रस्त्याचे कडेचे पाणलोट, निवडण्यांत आले होते. या कार्यक्रमाचे सनियंत्रण करण्यासाठी राज्य स्तरावर एक सुकाणू समितीही गठीत करण्यांत

आली होती. त्याचप्रमाणे विहीत कालमर्यादेत व गुणवत्तापूर्ण कामे होण्यासाठी आवश्यकतेनुसार मशिनव्दारे कामे करण्यासही परवानगी देण्यांत आली होती.

**साध्याचा गोषवारा**

वर नमूद केल्याप्रमाणे सन २००७-०८ मधे प्रत्येक तालुक्यातील एक याप्रमाणे ३५३ पाणलोट पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यांत आले होते. तथापि जलसंधारण विभागाने सातत्याने पाठपुरावा करुन या कार्यक्रमासाठी मोठया प्रमाणावर निधीची उपलब्धतता करुन घेतल्यामुळे राज्यांत ४०५ पाणलोट या कार्यक्रमांअंतर्गत पूर्ण करण्यांत आलेले आहे. या पुर्ण झालेल्या ४०५ पाणलोटांचे एकूण क्षेत्र ३.२४ लक्ष हेक्टर आहे. एकूण क्षेत्रापैकी सुमारे ८९ हजार हेक्टरवरील कामे अपूर्ण होती. ती सर्व कामे या योजनेतंर्गत पूर्ण करण्यात आली. हे काम पूर्ण करण्यासाठी एकूण रुपये ५३.२६ कोटी निधीची आवश्यकता होती. सदरचा निधी विविध राज्य योजनतंर्गत उपलब्ध करुन देण्यात आला. त्यामुळेच ३०४ तालुक्यातील कामे पूर्ण झाली. उर्वरीत ४१ तालुक्यापैकी १२ तालुक्यात मराठवाडा व विदर्भ पाणलोट मिशन अंतर्गत कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत तर २९ तालुक्यात कामे सुरु होऊ शकली नव्हती. या २९ तालुक्यातील पाणलोट सन २००८-०९ मध्ये प्राधान्याने सुरु करण्यात येत आहेत.